# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०८.०६.२०२४

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०७/०६/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५७,७५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. ०७/०६/२०२४ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०६ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ९,९८०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ०७/०६/२०२४ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण ९,६००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ०७/०६/२०२४ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द कलम २८३ भादंवि अन्वये एकुण ०६ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अवैधरित्या वाळुची चोरी करणाऱ्या विरुध कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या वाळुची चोरी करण्याऱ्या विरुध दि. ०७/०६/२०२४ रोजी एकुण ०१ ठिकाणी कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३७९, २७९, ३३७, ३४ भादवी सहकलम ४८ (७) (८) अवैध गौण खनिज अधिनियम अन्वये कार्यवाही करण्यात आली.

१) पोस्टे हट्टा, मौ वडद गावातील मारोती मंदिराजवळ, यातील आरोपीतांनी संगणमत करून शासनाची अवैधरित्या वाळु चोरून व यातील फिर्यादी हि शासकीय कामकाज करत असतांना त्यातील आरोपी याने आपल्या ताब्यातील वाळुने भरलेले ट्रॅक्टर भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या स्कुटीला ट्रॅक्टरच्या ट्रॉलीने धक्का देवुन साधी दुखापत केली व इतर तिघे यांनी फिर्यादीस शिवीगाळ करून धक्काबुकीने जबरदस्तीने वाळुचे ट्रॅक्टर घेवुन गेले व ट्रॅक्टरखाली चिरडुन ठार मारीण अशी जिवे मारण्याची धमकी दिली व शासकीय कामात अढथळा केला म्हणुन गुन्हा.